मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पोटकलम १ प्रमाणे इमारतीचे बांधकाम करणेस द्यावयाचा परवाना दाखला

# ग्राम पंचायत माहोरे

ता. अंबरनाथ जि. ठाणे

जावक क्र.

दिनांक ३ / ८ / २०१७

श्री प्रकाश तुलसीमल वाधेचा रा. माहोरे ता. अंबरनाथ जि. ठाणे यांसी कळविण्यांत येते की, आपला घर/इमारत बांधणे/दुरुस्ती करणे बद्दलच्या ता. २५/५/२०१७ चा अर्ज ता. २५/५/२०१७ रोजी मिळाला. त्याप्रमाणे आपणांस कळविण्यात येते की, ग्राम पंचायत मासिक सभा ठराव क./आदेश क्र. ९८ ता. ३१/५/२०१७ अन्वये घर/इमारत बांधणे/दुरुस्ती तळ+२ करणेस खालील अटींवर नाहरकत दाखला देणेस येत आहे.

१) मुंबई ग्रा. प. अधिनियम १९५८ कलम ५२ पोट कलम ३ अन्वये परवानगी मिळाल्यापासून १ वर्षाचे आत बांधकामास सुरुवात करावी तसेच पोटकलम ४,५,६, च्या तरतूदीचे अनुपालन करणे आपलेवर बंधनकारक राहील.

२) कलम ५३ च्या तरतूदीचे संपूर्ण बंधन आपलेवर राहील त्यानुसार सांडपाण्याची व्यवस्था करणे, सार्वजनिक रस्त्यास बाध येणार नाही. अशी व्यवस्था करणे वगैरे आपलेवर बंधन राहील.

३) बांधकाम करणेपूर्वी आवश्यक असलेली महसूल खात्याची परवानगी घेणे आवश्यक असून स.नं. ची जागा एन. ए. (अकृषक) झालेशिवाय बांधकामास सुरुवात करु नये.

४) जागेच्या मालकी वहीवाट संबंधी हरकत वा वाद निर्माण झाल्यास परवानगीस स्थगीती दिली जाईल व जोपर्यंत वाद मिटत नाही तोपर्यंत स्थगीती कायम राहील. सदर वादाचे निराकरण अर्जदाराने करावयाचे असून निराकरण झालेनंतर पंचायतीस कळविले पाहिजे व स्थगीती रद्द करणे बाबत परवानगी घेतले शिवाय बांधकाम करता कामा नये.

५) होणारे सर्व बांधकाम आपले मालकीच्या व वहीवाटीच्या जागेत करावयाचे असून छपराचे पडणाऱ्या पाण्यापासून कोणास त्रास होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

६) इमारतीचे बांधकाम करताना महसूल खात्याकडून इमारतीचा नकाशा मंजूर करुन त्यातील अटी प्रमाणे आवश्यक ती चारी बाजूस मार्जीन तसेच रस्ता किमान (१० फूट) सोडून बांधकाम करावे.

७) नकाश्यात (प्लानमध्ये) दर्शविल्या प्रमाणेच बांधकाम करावे.

८) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतल्याशिवाय इमारतीचा/घराचा वापर करु नये.

९) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर कर आकारणीसाठी ग्रामपंचायत कळवावे.

१०) अर्जात दर्शविल्याप्रमाणे स. नं. ५ हि. नं. ७ मधील जागेत प्लान प्रमाणे या मापाचे घर तळ+२ इमारत बांधणेस वरिल अटीस, नियमास अधीन राहून नाहरकत दाखला देण्यांत येत आहे.

११) सोबत नकाश्याच्या (प्लानाच्या) २ प्रती जोडल्या आहेत.

या शिवाय ज्यादा अटी असल्यास नमुद करावेत.

१२) बांधकाम करताना जोडून सांडपाणी बांधकाम करण्यात यावे

१३) बांधकाम करून मेडून नाहरकत/जमीनीचे पुढे बांधकाम करण्यात यावे

Dsahak
ग्राम सेवक/ग्रा. वि. अ.
ग्राम पंचायत माहोरे
ता. अंबरनाथ जि. ठाणे

NARENDRA RAJANI
SPECIAL EXECUTIVE OFFICER
"KRISHNA VILLA", 1482/1,
SEC. 30, ULHASNAGAR - 421004

सरपंच/उपसरपंच
ग्राम पंचायत माहोरे
ता. अंबरनाथ जि. ठाणे